Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। सोमवार, दि. २० जूलै २०२६ । वर्ष १ । अंक १०२ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION



## प्रगतीच्या महामार्गावर भक्तीचा महासागर!

आळंदीहून पंढरपूरकडे निघालेल्या संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीसोबत शुभ्रवस्त्रधारी वारकऱ्यांचा जनसागर सोलापूर जिल्ह्यातील आधुनिक चौपदरी महामार्गावरून मार्गक्रमण करताना; टाळ-मृदंगाच्या गजरात आणि "ज्ञानोबा-तुकाराम" च्या जयघोषाने दुमदुमलेला अविस्मरणीय क्षण.

### नाशिकमध्ये उद्धव ठाकरे यांच्यावर जलसंपदा मंत्र्यांचा निशाणा

# ठाकरे गटात आणखी गळती होणार!

## एसटीपी प्रकल्पांवरही भूमिका स्पष्ट, 'नीट' आंदोलनाला ठाकरे गटाचा पाठिंबा

**जन सम्राट टाईम्स**

**नाशिक । राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडींमध्ये ठाकरे गटाला लक्ष्य करत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी रविवारी नाशिकमध्ये जोरदार टीका केली. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी इतरांच्या बहुमतावर टीका करण्याऐवजी स्वतःचा पक्ष वाचविण्यावर लक्ष केंद्रित करावे, असा सल्ला देतानाच "आणखी काही लोक पक्ष सोडण्याच्या तयारीत आहेत.**

अशीच परिस्थिती राहिली तर ठाकरे गटात शेवटी तुम्ही तिघेच उराल," असा उपरोधिक टोला त्यांनी लगावला.महाजन म्हणाले की, उद्धव ठाकरे अडीच वर्षे मुख्यमंत्री होते; मात्र त्या काळात ते मंत्रालयात नियमितपणे गेले नाहीत. त्यांच्या नेतृत्वामुळेच पक्षाची घसरण सुरू झाली असून आता त्याची किंमत त्यांनाच मोजावी लागत आहे, असा आरोप त्यांनी केला. एकेकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे कौतुक करणारे ठाकरे आता त्यांच्यावर टीका करत असल्याचा उल्लेख करत त्यांनी, "तेव्हाची भाषणे दाखवू का?" असा सवालही उपस्थित केला. भाजप कोणालाही वाकण्यास किंवा झुकण्यास भाग





पाडत नसल्याचे सांगत महाजन म्हणाले की, लोकच योग्य वेळी योग्य निर्णय घेत आहेत. उद्धव ठाकरे यांनी भविष्यातील राजकीय समीकरणांची स्वप्ने पाहावीत; मात्र ती 'मुंगेरीलाल के हसीन सपने' ठरतील, असा खोचक टोला त्यांनी लगावला. यावेळी महाजन यांनी नाशिकमध्ये सुरू असलेल्या पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली. दर रविवारी शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले जात असून यंदाही सुमारे आठ हजार झाडांची लागवड करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यातील काही झाडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या उपकेंद्राच्या परिसरात लावण्यात आली आहेत. नाशिकमधील सांडपाणी नदीत मिसळण्याची समस्या दूर करण्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपयांच्या सांडपाणी प्रक्रिया (एसटीपी) प्रकल्पाचे काम सुरू असून ते पुढील चार महिन्यांत पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रकल्पामुळे प्रक्रिया केलेले पाणी पुन्हा नदीत सोडले जाणार असल्याने पर्यावरण संरक्षणाला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

### रिंगरोडबाधित शेतकऱ्यांना दिलासा

नाशिक रिंगरोड प्रकल्पामुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावरही महाजन यांनी भूमिका मांडली. प्रकल्पातील केवळ १५ ते २० टक्के शेतकऱ्यांचे प्रश्न प्रलंबित असून त्यावर लवकरच तोडगा काढला जाईल, असे त्यांनी सांगितले. उपोषणकर्ते करण गायकर यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. दरम्यान, दिल्लीतील सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शिवसेना (ठाकरे गट) पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विद्यार्थ्यांनी नाशिकमधील शालिमार चौकात मानवी साखळी उभारून आंदोलन केले.

## नांदेड जिल्ह्यातील शिक्षकाच्या मृत्यूस दोषींवर कारवाईची मागणी

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ:| प्रतिनिधी :** नांदेड जिल्ह्यातील सुनील मोरे (वय 42) आपल्या दोन लहान मुलांसह कार गोदावरी नदीवरील पुलाचे रेलिंग तोडून थेट पाण्यात टाकल्याची घटना 17 जुलै 2026 रोजी सकाळी घडली आहे. या दुर्घटनेत शिक्षक आणि त्यांच्या दोन्ही मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.शिक्षकाचे नाव सुनील मोरे असून ते हिमायतनगर येथील पोता बुद्रुक जिल्हा परिषद शाळेत कार्यरत होते.

शाळेतील शालेय पोषण आहाराच्या कथित गैरव्यवहाराच्या चौकशीला अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या मानसिक छळाला कंटाळून गोदावरी नदीत आपल्या दोन गोंडस सारा (13) व सुमित (09) या मुलांसह आत्महत्या केली. दोन निरागस मुलांसह एका संवेदनशील शिक्षकाचा जीव शालेय पोषण आहारातील भ्रष्ट प्रवृत्तीने घेतला.

ज्या माऊलीचा नवरा दोन गोंडस जीव ओवाळून टाकावे अशी मुले पुन्हा या जगात या मावलीला भेटतील का..? तित्यांच्या मृत्यूस जबाबदार तत्कालीन हदगाव गट शिक्षणाधिकारी किसन फोले, विस्तार अधिकारी सूर्यकांत बच्चे, केंद्रप्रमुख शिवाजी कदम, सहशिक्षक दत्ता पवळे आदींच्या मानसिक त्रासाला कंटाळून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले.

## कासारखेड्यातील 'रील स्टार' कविता पाटील यांना 'डॉ. दा. गो. बोरसे पुरस्कार-२०२६'

### अहिरणी भाषा व खानदेशी संस्कृतीच्या संवर्धनासाठी कार्याची दखल

**जन सम्राट टाईम्स**

**यावल | प्रतिनिधी :** उत्तर महाराष्ट्र खानदेश विकास मंडळ संचलित जागतिक अहिरणी भाषा संवर्धन परिषद यांच्या वतीने नाशिक येथे आयोजित विशेष पुरस्कार सोहळ्यात यावल तालुक्यातील कासारखेडा येथील रहिवासी आणि सोशल मीडियावरील लोकप्रिय 'रील स्टार' सौ. कविता तुषार पाटील यांना 'डॉ. दा. गो. बोरसे पुरस्कार-२०२६' प्रदान



करून गौरविण्यात आले. सोशल मीडियाच्या माध्यमातून अहिरणी भाषा, खानदेशी संस्कृती आणि लोककलेचा प्रचार-प्रसार करत स्वतंत्र ओळख निर्माण केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानानंतर कासारखेडा गावासह यावल तालुका आणि जळगाव जिल्ह्यातील विविध स्तरांतून सौ. कविता पाटील यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.यावल तालुक्यातील कासारखेडा येथील रहिवासी आणि सोशल मीडियावरील लोकप्रिय 'रील स्टार' सौ. कविता तुषार पाटील यांना 'डॉ. दा. गो. बोरसे पुरस्कार-२०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

## ओबीसी जनता पार्टीची घोषणा; लक्ष्मण हाके यांची राजकारणात अधिकृत एंट्री

### बारामतीतून नव्या पक्षाची घोषणा; ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर सरकारवर टीका, सर्वसामान्यांसाठी लढण्याचा निर्धार

**जन सम्राट टाईम्स**

बारामती | प्रतिनिधी : ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर गेल्या काही वर्षांपासून आक्रमक भूमिका घेणारे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी आता सक्रिय राजकारणात उतरत स्वतंत्र 'ओबीसी जनता पार्टी' स्थापन करण्याची घोषणा केली आहे. बारामती येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी नव्या पक्षाची अधिकृत घोषणा करत राज्य सरकार आणि भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली. ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी अधिक प्रभावी लढा उभारण्यासाठी हा पक्ष स्थापन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांशी संवाद साधताना हाके यांनी भारतीय जनता पक्षावर विरोधी आवाज दडपण्याचा आरोप केला. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपले प्रश्न मांडण्याचा अधिकार असताना आंदोलने दडपण्याचे काम सरकारकडून सुरू असल्याचा दावा त्यांनी केला. सरकार विरोधी भूमिका घेणाऱ्यांना लक्ष्य केले जात असल्याने लोकशाही मूल्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे ते म्हणाले. ओबीसी समाजाच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध महामंडळांना पुरेसा निधी दिला जात नसल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यामुळे समाजातील अनेक योजना रखडल्या असून विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक योजनांचा लाभ वेळेवर मिळत नसल्याचे त्यांनी नमूद केले. राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून त्यांनी, "ओबीसी महामंडळांना निधी कधी मिळणार? विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांना आर्थिक तरतूद कधी केली जाणार?" असा थेट सवाल उपस्थित केला. यावेळी हाके यांनी नव्या पक्षाची भूमिका स्पष्ट करत हा पक्ष कोणालाही आमदार, खासदार, मंत्री किंवा मुख्यमंत्री बनविण्यासाठी स्थापन करण्यात आलेला नसल्याचे सांगितले. "हा पक्ष सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी लढेल. कोणाचे राजकीय लाड पुरवण्यासाठी किंवा सत्तेच्या राजकारणासाठी हा पक्ष स्थापन केलेला नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील ओबीसी समाजाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक तसेच आर्थिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविण्यासाठी 'ओबीसी जनता पार्टी' राज्यभर संघटनात्मक विस्तार करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. येत्या काळात राज्यभर दौरे, बैठका आणि जनजागृती अभियान राबवून पक्षाची बांधणी केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.लक्ष्मण हाके यांच्या या घोषणेमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. विशेषतः ओबीसी मतदारांमध्ये या नव्या पक्षाला कितपत प्रतिसाद मिळतो आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विधानसभा निवडणुकांमध्ये या पक्षाचा किती प्रभाव पडतो, याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे. ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर सातत्याने आंदोलन करणाऱ्या लक्ष्मण हाके यांनी आता आंदोलनाच्या पुढच्या टप्प्यात राजकीय पर्याय उभा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात 'ओबीसी जनता पार्टी' कितपत प्रभावी ठरते, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

## दारूसाठी पैसे न दिल्याच्या रागातून तरुणावर हल्ला!

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव :** दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याच्या रागातून एका तरुणावर धारदार पट्टीने जीवघेणा हल्ला केल्याची घटना शहरातील गांधी मार्केट परिसरात घडली. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवार (दि. १५ जुलै) रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास गांधी मार्केटच्या मागील बाजूस असलेल्या नागोरी दुकानासमोर हा प्रकार घडला. संशयिताने नशेच्या अवस्थेत खिशातून दोन धारदार पट्ट्या काढून हमेंत बाळकृष्ण कोळी (वय ३२, रा. दिनकरनगर) यांच्यावर चेहरा, छाती, पोट आणि मानेवर सपासप वार केले. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. जखमी हमेंत कोळी यांच्या फिर्यादीवरून बाळा शिंपी (रा. शिवाजीनगर, हुडको) याच्याविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## जन सम्राट टाइम्सच्या वार्ताहरांचा स्नेहमेळावा; ओळखपत्र वितरणासह पत्रकारितेच्या विविध विषयांवर मंथन

### ३५ वार्ताहरांचा उत्स्फूर्त सहभाग; मुख्य संपादक मुकुंदराव नन्नवरे यांचे मार्गदर्शन, दैनिकाच्या विस्तारासाठी प्रतिनिधींच्या सूचना

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव । प्रतिनिधी:** दैनिक जन सम्राट टाइम्सच्या जिल्हाभरातील वार्ताहरांचा स्नेहमेळावा, ओळखपत्र वितरण समारंभ आणि पत्रकारितेतील विविध विषयांवरील मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. जळगाव येथील अजिंठा शासकीय विश्रामगृहात रविवारी (दि. १९ जुलै) दुपारी १२ ते ३ या वेळेत आयोजित कार्यक्रमात जळगाव जिल्ह्यातील तब्बल ३५ वार्ताहरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिकाचे मुख्य संपादक तथा संस्थापक अध्यक्ष मुकुंदराव नन्नवरे होते. यावेळी त्यांनी पत्रकारितेतील बदलते स्वरूप, डिजिटल माध्यमांचे वाढते महत्त्व, वृत्तांकनातील अचूकता, निष्पक्षता आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. पत्रकारांनी सत्य, विश्वासार्हता आणि समाजहिताला प्राधान्य देत काम करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष पी. एम. पाटील यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून दैनिक जन सम्राट टाइम्सच्या यशस्वी वाटचालीबद्दल शुभेच्छा दिल्या. त्यांनी जिल्ह्यातील वार्ताहरांनी स्थानिक प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडून समाजाप्रती आपली जबाबदारी सक्षमपणे पार पाडावी, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला राष्ट्रपती पदक विजेते दिनकर अडकमोल यांनीही विशेष उपस्थिती लावली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला



विशेष प्रतिष्ठा लाभली. त्यांनी पत्रकारितेच्या सामाजिक भूमिकेचे महत्त्व अधोरेखित करत प्रामाणिक आणि धाडसी पत्रकारितेची गरज असल्याचे सांगितले. ओळखपत्र वितरण समारंभात जिल्ह्यातील सर्व वार्ताहरांना अधिकृत ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले. यामुळे वार्ताहरांना त्यांच्या कामकाजात अधिकृत ओळख मिळण्याबरोबरच जबाबदारीची जाणीव अधिक बळकट होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान उपस्थित वार्ताहरांनीही आपली मते मांडत वृत्तांकन करताना येणाऱ्या विविध अडचणी, ग्रामीण भागातील पत्रकारांना भेडसावणाऱ्या समस्या, माहिती संकलनातील अडथळे तसेच पत्रकारांच्या सुरक्षिततेसंदर्भातील मुद्दे उपस्थित केले. या सर्व बाबींवर मुख्य संपादक मुकुंदराव नन्नवरे यांनी सकारात्मक भूमिका घेत प्रतिनिधींच्या सूचनांची दखल घेतली. यावेळी अनेक वार्ताहरांनी दैनिकाचा अधिक विस्तार व्हावा, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील बातम्यांना अधिक स्थान मिळावे तसेच दैनिकाची पाने वाढवून वाचकांना अधिक दर्जेदार आणि व्यापक आशय उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही संस्थापक अध्यक्षांकडे केली. यावर सकारात्मक विचार करून दैनिकाच्या भविष्यातील विस्तारासाठी नियोजन करण्यात येईल, अशी ग्वाही नन्नवरे यांनी दिली.

### जिल्हाभरातील वार्ताहरांना एकमेकांशी संवाद

स्नेहमेळाव्यामुळे जिल्हाभरातील वार्ताहरांना एकमेकांशी संवाद साधण्याची, अनुभवांची देवाणघेवाण करण्याची आणि संस्थेच्या भावी वाटचालीबाबत विचारमंथन करण्याची संधी मिळाली. पत्रकारितेतील बदलत्या प्रवाहांशी सुसंगत राहून जन सम्राट टाइम्स अधिक सक्षम आणि व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. आपुलकी, स्नेह आणि पत्रकारितेच्या बांधिलकीचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली.

# 'आमदारकी पणाला लागली तरी चालेल; पाचोरा-भडगाव चाळीसगावला जोडू देणार नाही'!

## अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्राविरोधात आक्रमक भूमिका

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** चाळीसगाव येथे प्रस्तावित अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात पाचोरा आणि भडगाव तालुक्यांचा समावेश करण्याच्या हालचालींना पाचोराचे आमदार किशोर पाटील यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. "यासाठी माझी आमदारकी पणाला लागली तरी चालेल, पण पाचोरा-भडगाव तालुका चाळीसगावला जोडू देणार नाही. गरज पडल्यास शिवसेना स्टाईलने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू," असा आक्रमक इशारा त्यांनी पत्रकार परिषदेत दिला. आमदार किशोर पाटील म्हणाले की, चाळीसगाव येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यास त्यांचा कोणताही विरोध नाही. मात्र, एका व्यक्तीच्या आग्रहाखातर पाचोरा आणि भडगाव तालुका या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. चाळीसगावला अधिक शासकीय सुविधा मिळाव्यात, जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू व्हावे, यालाही आमचा विरोध नाही. मात्र, त्यासाठी पाचोरा-भडगाव तालुक्यांचा बळी देऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले. भौगोलिक आणि प्रशासकीयदृष्ट्या पाचोरा तालुका जळगावशी अधिक जवळचा असल्याचे सांगत त्यांनी नागरिकांच्या सोयीचा मुद्दा उपस्थित केला. जिल्हाधिकारी कार्यालय,



पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा न्यायालय, शासकीय रुग्णालय तसेच इतर महत्त्वाच्या शासकीय कामांसाठी नागरिकांना जळगावला जाणे अधिक सोयीचे असल्याचे त्यांनी नमूद केले. पूर्व भागातील पिंपळगाव हरेश्वर, बांबरुड राणीचे, लोहारा, सातगाव डोंगरी, सामनेर, शिंदाड यांसह सुमारे २० ते २२ गावांतील नागरिकांना चाळीसगावपर्यंत पोहोचण्यासाठी ७० ते ८० किलोमीटरचा प्रवास करावा लागेल. त्याउलट जळगाव हे केवळ १५ ते २० किलोमीटर अंतरावर असल्याने प्रस्तावित बदलामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होणार असल्याचा दावा त्यांनी केला. या निर्णयाविरोधात लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारण्यात येणार असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले. पाचोरा आणि भडगाव तालुक्यातील नागरिकांच्या सह्यांचे निवेदन तयार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांना पाठविण्यात येणार असून, संबंधितांची प्रत्यक्ष भेट घेऊन नागरिकांची भूमिका मांडणार असल्याची माहिती त्यांनी दिली. राजकीय दबावापेक्षा जनतेचे हित महत्त्वाचे असल्याचे सांगत, नागरिकांच्या सोयीच्या विरोधात कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही, अशी ठाम भूमिका आमदार किशोर पाटील यांनी व्यक्त केली. या मुद्द्यावर शासनाने पुनर्विचार करावा, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला.

### नागरिकांच्या सोयीचा मुद्दा उपस्थित

अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रावरून जळगाव जिल्ह्यात राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत असून, शासन याबाबत काय निर्णय घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.चाळीसगावला अधिक शासकीय सुविधा मिळाव्यात, जिल्हाधिकारी किंवा अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू व्हावे, यालाही आमचा विरोध नाही. मात्र, त्यासाठी पाचोरा-भडगाव तालुक्यांचा बळी देऊ नये, असे त्यांनी स्पष्ट केले. भौगोलिक आणि प्रशासकीयदृष्ट्या पाचोरा तालुका जळगावशी अधिक जवळचा असल्याचे सांगत त्यांनी नागरिकांच्या सोयीचा मुद्दा उपस्थित केला.

# डॉ. पावसे यांना 'राज्यस्तरीय लोकनायक पुरस्कार-२०२६'

जन सम्राट टाईम्स




**उल्हासनगर | प्रतिनिधी:** सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत डॉ. अनिल गणपत पावसे यांची 'राज्यस्तरीय महाराष्ट्र लोकनायक पुरस्कार-२०२६' साठी निवड करण्यात आली आहे. दैनिक लोक युवाच्या वर्धापनदिनानिमित्त तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शेगाव येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. डॉ. पावसे यांनी शिक्षण, समाजसेवा, साहित्य, सांस्कृतिक उपक्रम तसेच वंचित घटकांच्या विकासासाठी सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्काराच्या घोषणेनंतर सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी डॉ. अनिल गणपत पावसे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.युवाच्या वर्धापनदिनानिमित्तलोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# लोकशाहीचा गळा घोटणारी दडपशाही?

## डॉ. कृष्णा गायकवाड यांचा मतलेख

भारतीय लोकशाहीची खरी ओळख केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून नागरिकांना शांततामय मार्गाने आपले मत मांडण्याचा आणि शासनापर्यंत आपल्या मागण्या पोहोचविण्याचा अधिकार ही तिची मूलभूत ताकद आहे. जेव्हा नागरिकांच्या प्रश्नांवर संवादाऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जातो, तेव्हा लोकशाहीच्या मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण होते, असे मत डॉ. कृष्णा गायकवाड यांनी व्यक्त केले आहे.लेखात त्यांनी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाच्या निमित्ताने लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शिक्षण व्यवस्था, पर्यावरण संरक्षण आणि शासनाच्या उत्तरदायित्वावर भाष्य केले आहे. त्यांनी वांगचुक यांचे कार्य शिक्षण, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाशी निगडित असल्याचे नमूद केले आहे.डॉ. गायकवाड यांनी नीट (NEET) परीक्षेतील कथित गैरव्यवहारांबाबत चिंता व्यक्त करत, शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास टिकवण्यासाठी शासनाने पारदर्शक आणि जबाबदार भूमिका घेणे आवश्यक असल्याचे मत मांडले आहे. तसेच लोकशाहीत नागरिकांच्या मागण्यांवर संवादाद्वारे तोडगा काढणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १९(१)(अ) आणि १९(१)(ब) अंतर्गत नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि शांततेने आंदोलन करण्याचा अधिकार असल्याचे नमूद करत, सार्वजनिक



सुव्यवस्थेच्या चौकटीत या अधिकारांचा सन्मान राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी लेखात स्पष्ट केले आहे.महात्मा गांधींच्या सत्याग्रहाची आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनात्मक मार्गाची आठवण करून देत, मतभेदांचे निराकरण संवाद, चर्चा आणि घटनात्मक प्रक्रियेद्वारेच व्हावे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. आंदोलनकर्त्यांना विरोधक म्हणून न पाहता त्यांच्या मागण्यांमागील वास्तव समजून घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. लेखाच्या शेवटी त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, भारतीय लोकशाहीत नागरिकांचा आवाज ऐकला जाईल की दडपला जाईल? या प्रश्नाचे उत्तर लोकशाहीच्या भविष्यासाठी महत्त्वाचे ठरेल, असे त्यांनी म्हटले आहे. — डॉ. कृष्णा गायकवाडसहयोगी प्राध्यापक, श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर टीप : या लेखातील मते व भूमिका या लेखकाच्या वैयक्तिक असून, त्याच्याशी संपादक किंवा वृत्तसंस्थेचे सहमत असणे आवश्यक नाही. तसेच लेखातील काही दावे व आरोप हे लेखकाचे मत म्हणून प्रकाशित करण्यात येत आहेत.

# गुजरातच्या सराफ व्यापाऱ्याचे दीड कोटींचे सोने चोरी; धुळे पोलिसांनी अवघ्या सहा तासांत आरोपीला जेरबंद

## लॉजमधील चोरीचा जलद छडा; मुद्देमालासह आरोपी ताब्यात

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे शहरातील व्यापाऱ्यांना सोने दाखविण्यासाठी गुजरातमधील जुनागड येथून आलेल्या सराफ व्यापाऱ्याचे सुमारे दीड कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने लॉजमधून चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणाचा आझाद नगर पोलिसांनी अवघ्या सहा तासांत छडा लावत आरोपीला मुद्देमालासह ताब्यात घेतले, त्यामुळे पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अश्विनभाई दुर्लभभाई काचलिया (वय ६५, रा. जुनागड, गुजरात) हे धुळेतील सराफ व्यापाऱ्यांना सोने दाखविण्यासाठी आले होते. त्यांनी धुळेतील द्वारकामाई लॉज येथील रूम क्रमांक २१९ मध्ये मुक्काम केला होता.

याच ठिकाणाहून त्यांच्याकडील सुमारे दीड कोटी रुपयांचे सोने चोरीला गेले. घटनेची माहिती मिळताच आझाद नगर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण



### सहा तासांत आरोपी ताब्यात

या प्रकरणाचा आझाद नगर पोलिसांनी अवघ्या सहा तासांत छडा लावत आरोपीला मुद्देमालासह ताब्यात घेतले, त्यामुळे पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अश्विनभाई दुर्लभभाई काचलिया (वय ६५, रा. जुनागड, गुजरात) हे धुळेतील सराफ व्यापाऱ्यांना सोने दाखविण्यासाठी आले होते.

आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी हितेश सुरेश सोनी (वय ४२, रा. प्लॉट क्र. २७, मालेगाव रोड, धुळे) याला ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी आझाद नगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०५(अ) आणि ३३१(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली आझाद नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय ठाकूर यांच्यासह गौतम सपकाळे, योगेश शिरसाट, रफिक पठाण, शांतीलाल सोनवणे, संदीप कडरे, मनोज बागुल, विजय शिरसाठ, योगेश शिंदे, पंकज जोंधळे, अनिल शिंपी आणि मकसूद खान पठाण यांचा सहभाग होता.

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात; कारला आग लागून पाच जणांचा मृत्यू

## वर्ध्यातील विरूळजवळ मालवाहू वाहनाची जोरदार धडक

जन सम्राट टाईम्स

**वर्धा | प्रतिनिधी:** समृद्धी महामार्गावर वर्धा जिल्ह्यातील विरूळ गावाजवळ रविवारी मध्यरात्री भीषण अपघात झाला. मालवाहू वाहनाने कारला मागून दिलेल्या जोरदार धडकेनंतर कारने पेट घेतल्याने पाच जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. या दुर्घटनेमुळे काही काळ समृद्धी महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, अपघाताच्या काही वेळ आधी समृद्धी महामार्गावर इथेनॉल वाहून नेणारा टँकर पलटी झाल्याने वाहतुकीत बदल करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर विरूळ गावाजवळ मालवाहू वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहनाने समोरील कारला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की कारने क्षणार्धात पेट घेतला. आगीच्या ज्वाळांनी संपूर्ण कार वेढल्याने आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर पडण्याची संधीही मिळाली नाही. या दुर्घटनेत कारमधील चार जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर मालवाहू वाहनातील एका व्यक्तीचाही मृत्यू झाला. अन्य एक जण गंभीर जखमी असून त्याच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, पुलगाव पोलीस तसेच आपत्कालीन बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. त्यानंतर मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले. अपघातामुळे समृद्धी महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे बंद ठेवण्यात आली होती. त्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर एका मार्गिकेवरून वाहतूक टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात आली. पोलिसांनी अपघाताचे कारण शोधण्यासाठी तपास सुरू केला असून, वाहनांचा वेग, वाहतुकीतील बदल आणि चालकाचे नियंत्रण सुटण्यामागील कारणांची चौकशी केली जात आहे. रांजणगाव एमआयडीसीतही दुर्दैवी अपघात दरम्यान, पुणे जिल्ह्यातील रांजणगाव एमआयडीसी परिसरातही रविवारी एक दुर्दैवी औद्योगिक अपघात घडला. एका कंपनीत माल भरल्यानंतर टेम्पोच्या मागील बाजूस पडदा बांधत असताना चालक टेम्पो आणि लोडिंग रॅम्प यांच्या दरम्यान अडकला. या अपघातात चालक गंभीर जखमी झाला. सहकाऱ्यांनी त्याला तातडीने शिरूर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेमुळे औद्योगिक परिसरात हळहळ व्यक्त होत असून, रांजणगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत. समृद्धी महामार्गावरील भीषण अपघात आणि रांजणगाव एमआयडीसीतील औद्योगिक दुर्घटना या दोन घटनांमुळे राज्यात पुन्हा एकदा रस्ते आणि औद्योगिक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# नवीन अंगणवाडी मंजूर; बांधकाम रखडले, पालक संतप्त

जन सम्राट टाईम्स

**कढोली (ता. एरंडोल)। प्रतिनिधी:** कढोली गावातील अंगणवाडी इमारतींच्या दुरवस्थेमुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. गावात चार अंगणवाड्या सुरू असल्या तरी त्यापैकी दोन इमारती जीर्ण व धोकादायक झाल्याने गेल्या दीड ते दोन वर्षांपासून चारही अंगणवाड्यांतील विद्यार्थ्यांना केवळ दोनच इमारतींमध्ये बसविण्यात येत आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिक गंभीर बनत असून पालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. ग्रामपंचायतीने दोन्ही नवीन अंगणवाड्यांसाठी संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यापैकी एका अंगणवाडीच्या बांधकामासाठी वर्क ऑर्डर मंजूर होऊन चार ते पाच महिने उलटले असतानाही प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झालेली नाही.

त्यामुळे संबंधित बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. जुनी अंगणवाडी इमारत अत्यंत जीर्ण झाली असून भिंतींना तडे गेले आहेत. ही इमारत पाडून त्याच ठिकाणी नवीन अंगणवाडी उभारण्याची मागणी ग्रामस्थ आणि पालकांनी अनेकदा केली आहे.

मात्र, तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. गावातील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असतानाही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. संबंधित विभागाने तातडीने रखडलेले बांधकाम सुरू करून नवीन अंगणवाडी इमारतीचे काम पूर्ण करावे, अशी मागणी पालक आणि नागरिकांकडून करण्यात येत आहे. ठेकेदाराचे नावही अस्पष्ट स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, वर्क ऑर्डर मंजूर होऊन चार ते पाच महिने झाले असले तरी संबंधित ठेकेदाराचे नाव महिला व बालविकास विभागालाही स्पष्टपणे सांगता आले नाही. तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही ते फोन उचलत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे.

# 'मै देशभक्त हूँ... अंधभक्त नही...'

## उद्धव ठाकरेंचा भाजपवर घणाघात



जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** दिल्लीतील जंतरमंतरवर सुरू असलेल्या अभिजीत दिपके यांच्या आंदोलनाला आणि पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला पाठिंबा देत शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवाजी पार्कवरील सभेत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. "मै देशभक्त हूँ... अंधभक्त नही..." हा नवा नारा देत त्यांनी देशभर जनआंदोलन उभारण्याचे आवाहन केले. दिल्लीतील जंतरमंतरवर गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ मुंबईत आयोजित सभेत उद्धव ठाकरे बोलत होते. यावेळी आमदार आदित्य ठाकरे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. उद्धव ठाकरे म्हणाले की, "मी स्वतः दिल्लीला जाणार आहे. हे आंदोलन फक्त जंतरमंतरपुरते मर्यादित राहता कामा नये. देशाच्या कानाकोपऱ्यात त्याची ठिणगी पोहोचली पाहिजे. गावागावात, गल्लोगल्ली या आंदोलनाचा आवाज घुमला पाहिजे." देशातील नागरिकांनी लोकशाही आणि संविधानाचे संरक्षण करण्यासाठी शांततामय मार्गाने आंदोलन उभारावे, असे आवाहन करत त्यांनी सभा, मशाल मोर्चे, मानवी साखळी, मेणबत्ती मोर्चे आणि विविध लोकशाही मार्गांनी सरकारविरोधात आवाज उठविण्याचे आवाहन केले. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाची आठवण करून देताना उद्धव ठाकरे म्हणाले, "त्या वेळी 'मै अण्णा हूँ' अशा टोप्या घातल्या जात होत्या. आता प्रत्येकाने 'मै देशभक्त हूँ... अंधभक्त नही...' असे लिहावे. आम्ही देशभक्त आहोत, पण कोणाच्याही अंधभक्तीवर विश्वास ठेवत नाही." सरकारवर टीका करताना त्यांनी म्हटले की, देशातील लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे. "ही एक ठिणगी आहे. वणवा पेटवण्यासाठी एक ठिणगी पुरेशी असते. ती ठिणगी पडली आहे. जनतेच्या ताकदीपुढे सत्ताधाऱ्यांना झुकावे लागेल," असा दावा त्यांनी केला. दिल्लीतील आंदोलनाबाबत बोलताना त्यांनी सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा उल्लेख केला. उपोषणानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यानंतर अभिजीत दिपके यांनी आंदोलनाची धुरा सांभाळल्याचे त्यांनी सांगितले.


# जळगाव जिल्ह्यात आजपासून पावसाची दमदार पुनरागमनाची शक्यता

## १९ ते २४ जुलैदरम्यान विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी** गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे जळगाव जिल्ह्यातील शेतकरी चिंतेत सापडला होता. पेरणीनंतर पावसाअभावी पिकांची वाढ खुंटण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र आता बळीराजासाठी दिलासादायक बातमी समोर आली असून, आज (१९ जुलै) पासून जिल्ह्यात मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता हवामान अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. १९ ते २४ जुलै या कालावधीत विजांच्या कडकडाटासह जोरदार ते मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. हवामानातील अनुकूल बदलांमुळे जळगावसह उत्तर महाराष्ट्रात पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे बाष्पयुक्त वारे वेगाने महाराष्ट्राच्या दिशेने सरकत आहेत. त्यामुळे ढगांची दाटी वाढून जिल्ह्यात पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार १९ जुलैपासून पावसाची सुरुवात होईल. सुरुवातीला काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी



बरसतील. त्यानंतर २० आणि २१ जुलै या दोन दिवसांत जिल्ह्यातील अनेक भागांत जोरदार पावसाची शक्यता असून, काही ठिकाणी मुसळधार पावसाचीही नोंद होऊ शकते. २२ ते २४ जुलै दरम्यान पावसाचा जोर काहीसा कमी झाला तरी मध्यम स्वरूपाचा पाऊस कायम राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाअभावी कापूस, सोयाबीन, मका, बाजरी आणि इतर खरीप पिकांवर ताण निर्माण झाला होता. अनेक शेतकऱ्यांनी दुबार पेरणीची भीती व्यक्त केली होती. अशा परिस्थितीत येणारा हा पाऊस पिकांसाठी जीवनदायी ठरणार असून, शेतीला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, 'एल निनो'चा प्रभाव आता पूर्णपणे ओसरल्याचे हवामान अभ्यासकांनी स्पष्ट केले आहे.

### शेतीची कामे नियोजनबद्ध पद्धतीने करा

मान्सूनची ताकद वाढली असून, उत्तर महाराष्ट्रात पावसासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे जुलै महिन्याच्या उर्वरित कालावधीत समाधानकारक पावसाची शक्यता अधिक बळावली आहे. तथापि, हवामान तज्ज्ञांनी २५ ऑगस्टनंतर पुन्हा पावसाबाबत काहीशी अनिश्चितता निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे जुलै महिन्यात होणारा पाऊस जलसाठे, भूजल पातळी आणि खरीप हंगामासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. दरम्यान, हवामान खात्याने नागरिकांना विजांच्या कडकडाटाच्या काळात सुरक्षित ठिकाणी राहण्याचा सल्ला दिला आहे. शेतकऱ्यांनीही हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शेतीची कामे नियोजनबद्ध पद्धतीने करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306